ISSN:2582-0346

जनता शिक्षण संस्थेचे

# किसन वीर महाविद्यालय, वाई

मराठी विभाग

आणि

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

यांच्या संयुक्त विद्यमाने

राष्ट्रीय चर्चासत्र

# अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान

## विशेषांक



डॉ. एकनाथ भालेराव
प्र. प्राचार्य,
प्रमुख संपादक

डॉ. चंद्रकांत कांबळे
कार्यकारी संपादक

सोमवार, ३० डिसेंबर, २०१९

# Research Journal of Kisan Veer Mahavidyalaya, Wai

(A Multilingual & Multi-disciplinary Research Journal)
ISSN:2582-0346

**Editor in Chief & Publisher**
**Dr. E. B. Bhalerao**
**Principal, Kisan Veer Mahavidyalaya, Wai**
Email:prin.kvmwai@rediffmail.com

# संपादकीय



लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे चतु:रस्त्र साहित्यिक होते. १ ऑगस्ट २०१९ ते ३१ जुलै २०२० हे त्यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आमच्या किसन वीर महाविद्यालयातील मराठी विभाग व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ३० डिसेंबर २०१९ रोजी 'अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यक्षेत्रातील योगदान' या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयात विविध विषयांवर नेहमीच चर्चासत्रांचे आयोजन केले जाते, त्याचाच एक भाग म्हणून या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. अण्णा भाऊ साठे यांचे चरित्र, साहित्य आणि एकूणच कार्य सहजपणे कोणाच्याही नजरेत भरते. कमालिची प्रतिकूल परिस्थिती, दारिद्रय, कसलीही प्रत्यक्ष गौरवशाली परंपरा नाही, औपचारिक शिक्षणाचा अभाव, जगण्यासाठी सतत करावा लागणारा संघर्ष, अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये जीवनाचा प्रवास करताना त्यांच्या अंतरंगात विषमतेविरूध्द विद्रोह होता.

अण्णा भाऊंनी औपचारिक शिक्षण घेतलेलं नसलं, तरी आजूबाजूचं जग त्यांनी अतिशय बारकाईने पाहिले होते. वाटेगाव सोडेपर्यंत दारिद्र्याने त्यांना पाटीपेन्सिल धरू दिली नाही. कम्युनिस्टांच्या कामगार चळवळीतील मित्रांनी त्यांना अक्षरे गिरवायला शिकविली. रात्रीच्या शाळेत मार्क्सवादाचे धडे दिले आणि १९४२ सालापासून अण्णा भाऊंनी स्फूट लेखनाला सुरूवात केली. सुरूवातीला त्यांनी पोवाडे, लावण्या, गण, वगनाटये, छक्कड, किसानगीते , मजूरगीते इ. चे लेखन केले. वयाच्या १० व्या वर्षी त्यांनी 'पानिपतचा पोवाडा, लिहिला. विविध गीतांच्या रचना करून मित्रांना गाऊन दाखविणारे अण्णा भाऊ तमाशातही काम करीत होते.

अण्णा भाऊ हे प्रारंभी मार्क्सवादी होते. या मार्क्सवादी विचारांचा उपयोग त्यांनी प्रचारकी गीतांसाठी केला. ते मार्क्सवादी शाहीर होते. आपल्या शाहिरीच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधनाचे बहुमोल कार्य केले. अण्णा भाऊ हे वृत्तीने साम्यवादी व अंतरंगाने आंबेडकरवादी होते.

अण्णा भाऊ ज्या काळात लिहीत होते, तो काळ मराठी सारस्वतांच्या साहित्याच्या भरभराटीचा होता. तर दुसऱ्या बाजूला जातीभेद, अन्याय, अत्याचार सुरू होते. हा भेद नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर अहोरात्र झटत होते. परंतु त्यांच्या कार्याचे चित्रण तत्कालीन साहित्यिकांच्या साहित्यातून फारसे येत नव्हते. त्यांच्या साहित्याचा विषय दलित समाज नव्हता व त्यामुळे त्यातील नायकही दलित असणे शक्य नव्हते. उच्चभ्रू, श्रीमंत, मध्यमवर्गीय नायक–नायिकांच्याभोवती त्यावेळचे साहित्य रूंजी घालत होते. याच काळात अण्णा भाऊंनी प्रत्यक्ष जगलेले वास्तव, अत्यंत कटू अनुभव, उघडया–बोडक्या माळावरची, निधडया छातीची, बेदरकार माणसे आपल्या साहित्याचे नायक करून अनेक कथा, कादंबऱ्या लिहिल्या. मराठी साहित्यविश्वाला ज्ञात नसलेले विषय दिले. या संदर्भात सुप्रसिध्द साहित्यिक वि. स. खांडेकर म्हणतात. ''अण्णा भाऊंचा प्रकृतीधर्म हा एका गंभीर लेखकाचा आहे. त्यांनी फार भोगले. जे भोगलं तेच लिहिलं. जीवनातील क्रूर सत्याचे दर्शन त्यांना झाले होते. तळागाळातील माणसाचे अनुभव त्यांनी घेतले होते. ते पचविले होते. आमच्यासारख्या सुखवस्तू लेखकासारखे अण्णा भाऊ लिहीत नव्हते. त्यांनी लहानपणापासून जे जे पाहिले, जगले, भोगले ते अगदी टिप कागदासारखे टिपून घेतले. गरीब माणसाच्या सुखदु:खासह त्यांचे अश्रू अण्णा भाऊंनी टिपले.''

अण्णा भाऊंच्या साहित्याचे प्रामुख्याने दोन भाग करता येतील. पहिला पद्य तर दुसरा गद्य.पद्य लेखनात ते मार्क्सवादाकडे झुकलेले दिसतात, तर गद्य लेखनात आंबेडकरवादाकडे. विषमतेवर आधारलेली आणि माणसाला गुलाम बनवून त्याचं शोषण करणारी समाजव्यवस्था बदलणं हा अण्णा भाऊंचा ध्यास होता. त्यामुळे त्यांनी आपल्या साहित्यात 'समाजपरिवर्तन' हा विषय वारंवार मांडला आहे. साधारणत: १९४६ ते १९६६ हा काळ त्यांच्या वाङ्मयनिर्मितीचा होता. ते आंतरराष्ट्रीय दर्जाचे साहित्यिक होते. जगातील समाजवादी देशातील अनेक भाषांत त्यांच्या साहित्याचे भाषांतर झाले आहे. शेवटी एवढेच म्हणता येईल अण्णा भाऊ हे राजकीयदृष्टया मार्क्सवादी, कॉम्रेड होते, कलेच्या क्षेत्रातील ते एक महान लोकशाहीर होते आणि वाङ्मयाच्या क्षेत्रात ते एक क्रांतिकारी लेखक होते.

या राष्ट्रीय चर्चासत्राच्या आयोजनासाठी आमच्या संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष मा. प्रतापरावजी भोसले(भाऊ), उपाध्यक्ष मा. शंकरराव गाढवे, सर्व पदाधिकारी यांनी मान्यता दिली. व आमच्या विनंतीला मान देऊन, कार्यक्रमाच्या उद्घाटनाचे अध्यक्षस्थान भूषवून मा. प्रतापरावजी भोसले यांनी बहुमोल मार्गदर्शन केले, त्याबद्दल त्यांचे व सर्व संस्था पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा. मदनदादा भोसले हे नेहमीच चांगल्या कामांना प्रोत्साहन देताना दिसतात. अनेक साहित्यिकांशी व विचारवंतांशी त्यांचा निकटचा संबंध आहे. मराठी विभागाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चासत्राला त्यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या. अण्णा भाऊ साठे यांच्या जन्मशताब्धीनिमित्त, त्यांच्या साहित्याची नव्याने चिकित्सा व्हावी व अभ्यासकांना त्याचा लाभ व्हावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मा. मदनदादा भोसले यांच्या सहकार्याबद्दल मी. कृतन्यता व्यक्त करतो.

या चर्चासत्रासाठी बीजभाषक म्हणून लाभलेले गोवा विद्यापीठाचे माजी इंग्रजी विभाग प्रमुख व इंग्रजी भाषेचे अभ्यासक डॉ. आनंद पाटील, लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. विश्वनाथ शिंदे, दलित साहित्याचे अभ्यासक व समीक्षक डॉ. मनोहर जाधव, शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. दत्ता पाटील, डॉ. शरद गायकवाड, डॉ. गिरीश मोरे, डॉ. सुभाष वाघमारे या तज्ज्ञ मार्गदर्शकांचे आभार माणने मी माझे कर्तव्य समजतो.

चर्चासत्राच्या यशस्वितेसाठी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. शिवकुमार सोनाळकर, सचिव डॉ. प्रकाश दुकळे, सर्व पदाधिकारी यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले, त्याबद्दल त्यांचेही आभार.

या चर्चासत्रासाठी अनेक संशोधकांनी 'अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यक्षेत्रातील योगदान' या मुख्य विषयाच्या अनुषंगाने विविध उपविषयांवर शोधनिबंधामधून आपले विचार मांडलेले आहेत, त्याचा अभ्यासकांना निश्चितच उपयोग होईल, असे मला वाटते. आपणा सर्वांच्या सहकार्यबद्दल आपले आभार.

आपल्या निवृत्तीपूर्वी , अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर राष्ट्रीय चर्चासत्र व्हावे, म्हणून सतत आग्रह धरणारे व दुसऱ्या दिवशी निवृत्त होणारे, मराठी साहित्यप्रेमी तत्कालीन प्राचार्य , डॉ. चंद्रशेखर येवले, त्यांनतर प्रभारी प्राचार्य म्हणून काम पाहणारे डॉ. आय्. एफ्. पैलवान, विद्यमान प्रभारी प्राचार्य , डॉ. ई. बी. भालेराव, उपप्राचार्य, प्रा. व्ही. बी. करडे, डॉ. बी. बी. आगेडकर, ग्रंथपाल, प्रा. डॉ. एस्. पी. कांबळे,माझ्या विभागातील सहकारी डॉ. धनंजय निंबाळकर, डॉ. संग्राम थोरात, प्रा. चंद्रशेखर भारती, प्रा. रेश्मा पाटील, कार्यालयीन प्रमुख श्री. रघुनाथ शेलार, वरिष्ठ लिपीक श्री. दिलीप जाधव, लिपीक श्री. महेंद्र कोळी, श्री. जितेंद्र चव्हाण, महाविद्यालयतील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी चर्चासत्र यशस्वी होण्यासाठी जे परीश्रम घेतले व वेळोवेळी मार्गदर्शन केले, त्याबद्दल त्यांचेही आभार मानतो.

**डॉ. चंद्रकांत कांबळे**
**कार्यकारी संपादक**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | संशोधन लेख | लेखकाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|---|
| १ | वैश्विक मानवी मूल्ये जपणारे साहित्यिक: अण्णा भाऊ साठे | डॉ. दीपककुमार वळवी | ०१-०४ |
| २. | शाहिरी परंपरा समृद्ध करणारे लोकशाहिर: अण्णाभाऊ साठे | डॉ. बाळासाहेब चव्हाण | ०५-०८ |
| ३. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील वैचारिकता | डॉ. प्रकाश दुकळे | ०९-१२ |
| ४. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजजीवन | डॉ. मनमोहन राजे | १३-१८ |
| ५. | अण्णा भाऊ यांची वैशिष्ट्यपूर्ण लोकनाट्ये एक विचार | डॉ. अशोक तवर | १९-२२ |
| ६. | अण्णा भाऊ साठे यांच्या लावण्या व पोवाडे | प्रा. दत्तात्रय फटांगडे | २३-२५ |
| ७. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णा भाऊ साठे यांची कथा | डॉ. चंद्रकांत कांबळे | २६-२८ |
| ८. | लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या 'वारणेच्या खोऱ्यात' व 'मास्तर' या कादंबऱ्यांतील स्वातंत्र्यचळवळीचे चित्रण | डॉ. संग्राम थोरात | २९-३५ |
| ९. | 'मुंबईची लावणी'- अण्णाभाऊ साठे आणि शाहीर पठ्ठे बापूराव : साम्य आणि भेद | प्रा.संतोष पवार | ३६-३८ |
| १०. | अण्णाभाऊ साठेंच्या लावणीतील सामाजिकता | डॉ. विठ्ठल रोटे | ३९-४१ |
| ११. | अण्णाभाऊ साठे यांच्या 'डोळे व 'सापळा या कथांची समाजशास्त्रीय समीक्षा | डॉ. दत्तात्रय डांगे | ४२-४६ |
| १२. | फकिरा कादंबरीतील क्रांतिकारी नायक | डॉ. दत्तात्रय सावंत | ४७-५० |
| १३. | अण्णा भाऊ साठे यांचे कथाविश्व | सौ. अपर्णा खैरमोडे | ५१-५३ |
| १४. | दलित कथेचे शिल्पकार— अण्णाभाऊ साठे | डॉ. सुभाष पुलावळे | ५४-५८ |
| १५. | अण्णा भाऊ साठे यांची समाजप्रबोधनात्मक वगनाटये | सुस्मिता खुटाळे | ५९-६२ |
| १६. | विद्रोही नायिका | प्रा.शिवाजी मोतीबोणे | ६३-६५ |
| १७. | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या निवडक कांदबऱ्यातील स्त्री प्रतिमा | प्रा. मोरे पंडित | ६६-६८ |
| १८. | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील क्रांतीकारी नायक | डॉ. माने तुकाराम | ६९-७० |
| १९. | आण्णाभाऊ साठे यांच्या कथेतील जीवन संघर्ष | कु. मयुरी गणेशवाडे | ७१-७४ |
| २०. | आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याचे वेगळेपण | प्रा.संदीप उल्हाळकर | ७५-७९ |
| २१. | **अण्णा भाऊ साठे यांचे प्रवासवर्णन-माणूसपण व शोषणमुक्तीचा शोध** | प्रा. धनंजय वसंत भाट | ८०-८२ |
| २२. | दलित साहित्य आणि अण्णा भाऊ साठे | प्रा. मगेश जोर्वेकर | ८३-८६ |
| २३. | संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील अण्णा भाऊ साठे यांचे योगदान | डॉ. श्रीमती शैलजा शिंदे | ८७-८९ |
| २४. | अण्णाभाऊ साठे यांच्या शाहिरी साहित्यातील मार्क्सवाद | डॉ. शीतल गोर्डे-पाटील | ९०-९३ |
| २५. | अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील नायिका | डॉ. दत्तात्रय बारबोले | ९४-९६ |
| २६. | अण्णा भाऊ साठे यांच्या कथा साहित्यातील संस्कृती रक्षण आणि मूल्यसंवर्धन | प्रा. मुकुंद वलेकर | ९७-१०२ |
| २७. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवादं | डॉ. शशिकला रणदिवे | १०३-१०५ |
| २८. | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील क्रांतीकारक नायक | डॉ. शरद पवार | १०६-१०८ |
| २९. | उपेक्षितांचे चित्रण करणारे कथा लेखक अण्णाभाऊ साठे | डॉ. सोमनाथ दडस | १०९-१११ |
| ३०. | आण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील जीवन संघर्ष | डॉ. दिलीप सावंत | ११२-११३ |
| ३१. | अण्णाभाऊ साठे: साहित्यिक प्रवास | डॉ. प्रतिभा घाग | ११४-११६ |
| ३२. | माकडीचा माळ कादंबरीचे सामाजिक आकलन | डॉ. अतुल चौरे | ११७-११८ |
| ३३. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील आंबेडकरवाद | प्रा.लक्ष्मण साठे | ११९-१२१ |
| ३४. | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील विद्रोही नायिका | प्रा विकास बहुले | १२२-१२३ |
| ३५. | फकिरा: क्रांतिकारी नायकाची शौर्यगाथा | डॉ. मानसी जगदाळे | १२४-१२६ |
| ३६. | लोकशाहिर अण्णाभाऊ साठे | प्रा. डॉ. रमेश पोळ | १२७-१२९ |
| ३७. | 'फकिरा' मधील जोगणी उत्सव: स्वरूप व परंपरा | डॉ. जगदीश आवटे | १३०-१३२ |
| ३८. | आण्णाभाऊ साठे यांच्या कथेतील जीवन संघर्ष | प्रा. सौ. कल्पना शिंगाडे | १३३-१३६ |

Research Journal of Kisan Veer Mahavidyalaya, Wai
(A Multilingual and Multi-disciplinary Research Journal)
राष्ट्रीय चर्चासत्र , अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य क्षेत्रातील योगदान (३० डिसेंबर, २०१९)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णा भाऊ साठे यांची कथा

**डॉ. चंद्रकांत कांबळे**
मराठी विभाग प्रमुख
किसन वीर महाविद्यालय, वाई

अण्णा भाऊ साठे देश दलित कथाकारांच्या पहिल्या पिढीतील एक महत्वाचे कथाकार आहेत. त्यांनी वेगवेगळ्या साहित्यप्रकारांमध्ये विपूल लेखन केले आहे. याठिकाणी त्यांनी आंबेडकरी प्रेरणेने लिहिलेल्या कथांचा विचार करावयाचा आहे.

१९४९ मध्ये अण्णा भाऊंनी 'मशाल'साप्ताहिकामध्ये 'माझी दिवाळी' नावाची पहिली कथा लिहिली.त्यानंतर त्यांचे कथालेखन सातत्याने सुरु राहिले. चौदा भारतीय व अनेक परकीय भाषांमध्ये त्यांच्या कथा भा ांतरित झाल्या. कामगार, कष्टकरी, शेतकरी, अस्पृश्य, भटके, गुन्हेगार इत्यादिंच्या जीवनातील प्रश्न त्यांनी पोटतिडकीने आपल्या कथांमधून मांडले. आशयसंपन्नता आणि संघर्ष ही त्यांच्या कथेची महत्वाची वैशिष्टये आहेत. त्यांची मूळची प्रतिभा एका जातीवंत कथालेखकाची आहे. अण्णा भाऊंच्या कथेच्या सदर्भात आचार्य अत्रे म्हणतात, ''ही जगण्यासाठी लढणा—या माणसांची कथा आहे. इथल्या सर्वांच्या रक्तातून एकच लढाऊ ईर्षा वाहत आहे. त्या सर्वांना मानाने जगायचे आहे. अंगात असेल नसेल तेवढे बळ एकवटून त्यांना आक्रमक वृत्तीशी सामना द्यायचा आहे. आणि त्यात जिंकायचेही आहे. ही कच खाणारी, हार मानणारी माणसे नाहीत. वार झेलायला त्यांची छाती नेहमीच ताठयाने फुगलेली आहे. ठोसा द्यायला यांची मूठ नेहमीच वर उगारलेली आहे. धडक द्यायला यांचे मस्तक नेहमीच पुढे झुकलेले आहे''१ आचार्य अत्रे यांचे वरील विचार हे अण्णा भाऊंच्या एकूणच कथेच्या संदर्भात असले, तरी काही आंबेडकरी प्रेरणेच्या कथांनाही ते लागू पडतात.

अण्णा भाऊ हे प्रारंभी मार्क्सवादी होते. कम्युनिष्ठ पक्षाचे कार्यकर्ते होते. परंतु या विचाराचा उपयोग त्यांनी त्यांच्या प्रचारकी लोकनाटयामध्ये व गीतांमध्ये केला. असे असले, तरी त्यांच्या कथा—कादंब—यांमधून आंबेडकरवाद दिसून येतो. 'पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरली नसून, ती दलितांच्या तळहातावर तरली आहे', असे म्हणणा—या अण्णा भाऊंचा दलितांच्या श्रमशक्तीवर विश्वास होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला स्वाभिमान व समतेसाठीचा संघर्ष अण्णा भाऊंना भूरळ पाडतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्या काळात दलितांना माणूसपण मिळवून देण्यासाठी अविरत झगडत होते. त्या दरम्यानच्या काळात अण्णा भाऊंचे लेखन चालू होते. सुरूवातीच्या काळात मार्क्सवादी विचाराने झपाटलेला हा कलावंत लेखक नंतरच्या काळात 'जग बदल घालुनी घावा सांगुन गेले भिमराव' या गीतातून आंबेडकरी तत्वज्ञान मांडताना दिसतो. धर्मांधानी केलेली छळवणूक आणि धनवंतानी केलेली पिळवणूक याविरूध्द घाव घालायचा आहे, असे ते सांगतात. अन्याय, जुलुमाच्या कचाटयात सापडलेली ही माणसे सहनशिलतेचे बंध झुगारून कसे बंड करतात, बेभान होतात, याचे दर्शन अण्णा भाऊंच्या कथांत घडते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने दलितांमध्ये निर्माण झालेल्या अस्मितेचे चित्रण अण्णा भाऊंच्या 'सापळा','वळण' आणि 'उपकाराची फेड' या कथांमधून येताना दिसते. दलितांनी मेलेल्या गुरांची विल्हेवाट लावणे,त्यांचे मांस खाणे थांबवावे, असा संदेश डॉ. बाबासाहेबांनी दिला होता. त्या संदेशामुळे महारा ट्रातील अनेक गावांत तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली होती. अनेक गावांत दलितांना बहि काराला सामोरे जावे लागले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने जागृत झालेला महार समाज, गावकिची कामे सोडून दिल्यानंतर घडलेला एक प्रसंग 'सापळा' या कथेत येताना दिसतो. गावची मेलेली ढोरे ओढण्याचे काम जेव्हा महार मंडळी नाकारते व दादा देशमुखाचा मेलेला बैल घरात कुजू लागतो, तेव्हा तो उभ्या गावाला महारांच्या विरोधात उभा करतो. त्यांना जेरीस आणण्यासाठी एक सापळा उभे गाव लावून ठेवते. महारांना कोणत्याही प्रकाराचे सहकार्य करायचे नाही, असे सर्वजन ठरवतात. शेवटी, गरीब असणारी महार मंडळी मेटाकुटीला येते, पण त्यांचा नेता असणारा हरीबा महार गावावर खटला भरण्यासाठी तालुक्याला जात असतो.

वाटेत भेटलेल्या गुरवाकडून तो ५०० रुपयांना माळरानाचा लिलाव घेतो. महारवाडयाचे भाग्य उजाळते. परंतु गावकरी मात्र हादरुन जातात. गावकऱ्यांनी लावलेला सापळा निकामी होतो. एके दिवशी गावकामगार पाटलाची जनावरे सापळयात अडकल्याने पाटील हा सापळा काढून टाकल्याचे जाहीर करतो. दलितांचा विजय होतो. हरीबा महार आपल्या समाजबांधवाना म्हणतो,'कावडणी घेऊन आपल्या वाडवडिलांनी जन्मभर मेल्याली ढोर वडली. आज आपून ती कावडणीच जाळून टाकली. आता परत मेलेल्या ढोराला हात लावायचा न्हाय. टाचा घासून मरुया, परं मानानं मरुया. ढोरं वढतो म्हणून अम्ही कुत्र्यावानी ठरलोय'. हे हरिबाचे विचार म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार वाटतात. या विचाराने दलितांमध्ये निर्माण झालेली जागृती व अस्मिता याचे दर्शन घडताना दिसते.

अण्णा भाऊ साठे यांची 'वळण' ही कथा, गुराचे मांस खाण्याचे वळण पडलेल्या चिमा म्हातारी या व्यक्तिरेखेवर आधारित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांप्रमाणे जीवन जगणारी महार मंडळी मेलेल्या व मोठया जनावरांचे मांस खाण्याचे सोडून देतात, परंतु म्हातारी चिमा महारीण पिढयांपिढयाच्या वळणाप्रमाणे रेडयाचे मांस बंडू मांगाकडून विकत आणून खात असते. बळी महार हा आपल्या समाजात बदल घडविण्याचे ठरवितो. जो कोणी मृत जनावरांचे मांस खाईल.त्याला वाळीत टाकण्याचे काम तो करीत असतो. चिमा महारीण वरचेवर सापडत असते. दंड भरीत असते. शेवटी पाटलाच्या दरडावणीवरुन चिमाला दंड माफ होतो, पण तिला वाळीत टाकले जाते.

मास्तर आणि पाटलांच्या सांगण्याने महार आणि मांगांचा वाद तात्पुरता मिटतो, पण चिमा म्हातारीला मनापासून वाईट वाटत असते. गेली सत्तर वर्षे जनावरांचे मांस खाण्याचे वळण ती सात दिवसांत बदलू शकत नाही. आपले बदेवाईट झाले, तर भावकी आपणांस लोंबकळत ठेवील, अशी भिती वाटून ती आपले वावर एक हजार रुपयांना विकून भावकीत पाचशे रुपये देते आणि मास्तराकडे पाचशे रुपये देऊन ती मरण पावते.

महार समाजाचा म्होरक्या बळी व म्हातारीला चोरुन मांस देणारा बंडू मांग यांच्यातील संघर्ष लेखक चित्रित करताना दिसतो. परंतु या संघर्षपेक्षा चिमा म्हातारीचे वळण, तिची अगतिकता लेखक अतिशय मार्मिकपणे चित्रित करतो. मृत जनावरांचे मांस खाऊ नका, परिश्रम करुन नीटनेटके जीवन जगा, हा डॉ. बाबासहेब आंबेडकरांचा विचार या कथेमधून येताना दिसते. अस्पृश्यता हा भारतीय समाजरचनेतील ब्राम्हणांपासून अतिसामान्य अशा समजल्या जाणाऱ्या उपेक्षित ढोर, चांभार या जमातीपर्यंत सर्वत्र मुरलेला महाभयानक रोग आहे. या समाजवास्तवाचे बोलके विनोदी पध्दतीने घडविलेले दर्शन 'उपकारची फेड' या कथेत घडताना दिसते. मळू महार, लखू मांग, शंकर चांभार आणि मन्या परीट ही चार पात्रे उपेक्षित समजल्या जाणाऱ्या समाजातील आहेत. बलुतेदार समाजात जन्मलेली ही माणसे आपापसातही जातीयता मानतात. गावात पुढारी म्हणून मिरवत असलेला मन्या परीट आणि स्वत:ला शहाणा समजणारा शंकऱ्या चांभार वेगवेगळया राजकीय विषयांवर चर्चा करत असतात. चप्पल दुरुस्तीसाठी आलेल्या मळू महाराला शंकऱ्या चांभार आपल्यापेक्षा हीन मानत असतो. मांगा महाराच्या खेटराला हात लावू नये हा रिवाज शंकऱ्या काटेकोरपणे पाळत असतो. शंकऱ्या आरी आणि सळ मळूकडे फेकून देतो व म्हणतो, "हं, घ्या हये सामान नि करा नीट पायतान"[२] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक विचाराने व नेतृत्वामुळे स्वाभिमानी बनलेल्या मळू महाराला शंकऱ्या चांभाराचे वर्तन आपमानास्पद वाटते. स्वत: घरात जाऊन चहा पिऊन बाहेर आलेला शंकऱ्या देवळीत ठेवलेल्या खास कपातून मळूला चहा देवू करतो, परंतु स्वाभिमानी मळू त्याच्या चहाला नकार देतो. तो म्हणतो, 'मी चांभाराचा चहा पीत न्हाय'. दोघांमध्ये शाब्दिक चकमक होते. इतर बलुतेदारांपेक्षा स्वत:ला श्रेष्ठ समजणारा शंकऱ्या मळूला म्हणतो ,"अठरा पगड जात देवानं केलीया आणि आमी तुमास्नी सळ आणि आरी देतो, त्योच उपकार माना, इसरु नगा......"[३]

अस म्हणणाऱ्या 'शंकऱ्याला, 'तुझा सळ नि आरीचा उपकार फेडूनच मी मरनं', असं म्हणून मळू महार निघून जातो. मळू महार आणि शंकर चांभार या दोघांच्या आयु यात तो दिवस मोठा आणीबाणीचा ठरतो. त्या दिवसापासून ते एकमेकांशी बोलत नव्हते. काही दिवसांनी शंक—या चाभांराची म्हैस मरते. तिला गावाबाहेर ओढून न्यायला मळू नकार देतो. मळूच्या नकाराने चिडलेला शंक—या, मन्या परटाच्या मदतीने गावाची मदत घेऊन

म्हारूडा जाळण्याची भाषा करतो. मध्यस्थी करून गावचा पाटील चिडलेल्या शंकऱ्याला व मन्याला शांत करतो. शंकऱ्या पाटलाला विनंती करून सांगतो, '' 'माझी म्हस म्हार वढीत का न्हायती? इचारा. पायतानाचा अंगठा तुटला की त्येस्नी चांभार दिसतो. येरवी दिसत न्हाय.'

'का दिसत न्हाय? दिसतो की' मळू म्हणाला, 'आंगठा तुटला की तू सळ नि आरी देतोस'....... 'मग थांबा तर–' असं म्हणून मळू घरात गेला आणि आरुसं आणि कावडणी घेऊन आला. ती ढोरं ओढण्याची अवजारं चांभारापुढं ठेवून पुन्हा म्हणाला, 'एकदा सळ आणि आरी देऊन त्वा माझ्यावर उपकार केलास, आत हये आरुसं नि कावडणी देऊन मी त्या उपकाराची फेड करतो. हये घेऊन जा नि वढ आपली म्हस'. ''[४] मळूची उपकाराची फेड करण्याची ही विचित्र रीत पाहून सगळा गाव हसतो. मळूच्या मनातील दु:ख सर्वांच्या लक्षात येते. भारतीय समाजातील जातीय उतरंडीमुळे महार–मांग–चांभार समाजातही कशी श्रेष्ठ–कनिष्ठ भावना वाढीस लागते, याचे चित्रण या कथेत पहायला मिळते. या संदर्भात बाबुराव गुरव म्हणतात, ''अस्पृश्यता हा भारतीय समाजरचनेतील ब्राम्हणांपासून अतिसामान्य अशा उपेक्षित ढोर, चांभार या जातीपर्यंत सर्वत्र मुरलेला महाभयानक रोग आहे. विषमतापूजन ही या देशातील, हिंदू धर्मातील वरपासून खालपर्यंतच्या सर्वच समाजघटकांना जडलेली विकृती आहे. या समाजवास्तवाचे बोलके विनोदी दर्शन या कथेतून घडते जाते.''[५] बाबुराव गुरव यांनी 'उपकाराची फेड' या कथेच्या संदर्भात मांडलेले विचार हे विषमताजन्य भारतीय समाजव्यवस्थेवर प्रकाश टाकणारे आहेत. अण्णा भाऊ साठे यांच्या अभ्यासलेल्या कथांच्या आधारे त्यांची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.विषम समाजव्यवस्था आणि आर्थिक दुर्बलता यांमुळे दलितांना किती भीषण स्वरुपाचे जीवन जगावे लागत होते,याचे दर्शन घडताना दिसते. अण्णा भाऊंच्या बहुतेक सर्व कथा हया व्यक्तिचित्रणात्मक आहेत. त्यांना भेटलेल्या माणसांना, त्यांच्या स्वभाव वैशिष्टयासह त्यांनी कथेत उभे केले आहे. अण्णा भाऊ साठे हे मार्क्स आणि आंबेडकर यांचा आदर्श मानून लेखन करताना दिसतात. त्यांच्या साहित्यात नवा विषय, नवा आशय व नवा संघर्ष येताना दिसून येतो. अण्णा भाऊंनी दलितांची दु:खं वेशीवर टांगण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या कथेतील माणसे आपल्यावर झालेल्या अन्याय, अत्याचाराविरुध्द सतत संघर्ष करताना दिसतात. त्यांनी आंबेडकरी विचाराने पेटलेले अनेक नायक मराठी कथेला दिले आहेत. यातून त्यांच्यावर असलेल्या आंबेडकरी विचारांचा प्रभाव दिसून येतो.

संदर्भ

१) डॉ. भोसले एस्. एस्. : संपा. 'प्रातिनिधिक कथा', लोकवाड्.मय गृह, तिसरी आवृत्ती, १९४४,पृ. १००.
२) तत्रैव : पृ. १०२
३) तत्रैव : पृ. १०४
४) गुरव बाबुराव : 'अण्णा भाऊ साठे समाजविचार आणि साहित्यविवेचन', लोकवाड्.मयगृह, पाचवी आवृत्ती, २०१४, पृ ७६

***